# सुरतेवर छापा !

## पोवाडा —————— :१४:

मोठा पराक्रम शिवरायाचा विजेसारखा संचार। धडा दिला सुरतेला त्यानं ऐका कसा तो प्रकार ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

शिवाजीचा सूड घेण्याला । शास्ताखान आला । दख्खन देशाला । बरोबर फौज घेउनी फार ॥ जी ॥ येतां येतां चाकणला आला । त्यानं वेढा घातला किल्ल्याला । तिथं फिरंगोजी नरसाळा । तय्यार झाला । झुंज देण्याला ॥ चाकणचा किल्ला जिंकून । मोठ्या तडफेनं । चाल करून । पुण्याला शास्ताखान आला । लालबाग शिवाजीचा खास, वाडा पुण्यास । तळ ठोकून लालबागेत खान हो बसला ॥ दोन वर्सं लढा चालला । शिवाजीनं हल्ला चढविला । अन् खानाचीं बोटं कापून दूर पळविला ॥ शास्ताखान गेला आग्र्याला । सारं कळलं औरंगजेबाला । औरंगजेब भडकून गेला । अन् शिवाजीचा काटा काढायला । जयसिंह दिल्लीरखान चालले सूड घेण्याला ॥ पण त्यांना तोंड देण्याच्या आधीं । शिवाजीनं केला सुरतेवर हल्ला । तो कसा आतां सांगीन पुढच्या चौकाला ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

मोगलांशीं सामना द्यायला । आतां आणावा पैसा कोठून ? । दुस्मनाशीं सामना देतांना पडूं लागली पैशाची वाण ॥ जी ॥ शिवाजीनं

विचार जरा केला । "दुस्मनांनीं लुटलं आम्हांला । कैक वर्सं प्रकार हा झाला । गडगंच संपत्ती नेली लुटून त्या वेळा । आतां तीच आपली संपत्ती परत लुटून आणली तर त्यांत पाप कोणतं बोला ? । शिवाय दुस्मनाला वचक बसवायला । कांहीं तरी केलं पाहिजे मला " । असं म्हणून सुरत लुटण्याचा बेत त्यानं केला ॥ चाल ॥ सुरत सधन बंदर । होतं व्यापाऱ्यांचं नगर ॥ परदेशी जहाजं येतीं रोज सुरतेला ॥ कैक कोटींचा व्यापार रोज चालला । सरदार **इनायतखान** बंदोबस्ताला । शिवाजीनं गुपचुप बेत सारा ठरविला ॥ अन् १ जानेवारी १६६४ला । १०,००० फौज घेऊन राजा चालला ॥ १२९ मैल चालून गेला । आणि पांचव्या दिवसाला । तळ पडला गणदेवीला । तिथनं ३९ मैलांचा टप्पा राहिला । तेव्हां राजानं लिहिलं सुभेदाराला । आणि तिथल्या धनिकाला । कीं " बादशहानं आमचा उच्छेद मांडला । घरदार देवळं किती पाडलीं अंत ना त्याला । जुलुमाच्या खालीं भरडलं साऱ्या जनतेला ॥ हैराण केलं सर्वांला । किती पैसा लुटून त्यांनीं नेला । आतां प्रजेला दिलासा द्यायला । आम्ही आमचा झेंडा उभा केला । पण पैशाची जरुरी आम्हाला । म्हणून ९० लक्ष रुपये द्यावे आम्हाला । अशी मागणी आमची तुम्हांला । जर द्याल एवढ्या पैशाला तर आलों तसे परत आम्ही जाऊं, वचन तुम्हांला " ॥ शिवाजीच्या पत्रानं मोठा खळबळाट केला । आश्चर्य वाटलं सर्वांला कीं शिवाजी आला कसा सुरतेला ! । शिवाजी हा सैतान झाला । पंचवीस हात मारतोय उडीला । जमीनीतनं कोस कोस गेला । आकाशातनं उडून पण गेला । असं ऐकलं होतं तें खरं ठरलं या वेळा ॥ आतां काय करील ठाऊक कोणाला ? । लोक बोलले इनायतखानाला । " खानसाब ! कांहींतरी करा आणि हें संकट दूर करा " । पण इनायतखान खुनशी फार झाला । त्यानं शिवाजीला धडा शिकवायचा बेत हो केला ॥ शिवाजीचा काटा काढायला । त्याला दगाफटका करण्याचा त्यानं डाव एक केला ॥ २ ॥

● ●



## चौक ३ रा

दोन इसम मग इनायतखानाचे गेले राजाच्या भेटीला । लवून मुजरा केला त्यांनीं राहिले आदबीनं बाजूला ॥ झाड चंदनी मधें सुवासिक साप आले दोन झडपायला । खंजिर गुपचुप कमरेला पण हांसरा चेहरा वर झाला ॥ मारेकरी मग जवळ जाउनी बोलले श्रीशिवरायाला । " निरोप खानाचा हुजूर, सांगतों ऐका महाराज या वेळा ॥ जी ॥ तुमचा दरारा चारी बाजुला जसा सिंहाचा जंगलाला । अस्मानांतला सूर्य जणू काय पुढंच दिसला आम्हाला ॥ जी ॥ कीर्ती तुमची नवखंडाला सुभेदारही बावरला । देऊं खंडणी पण खानाचा निरोप प्रेमाचा तुम्हाला ॥ जी ॥ बोलून इतके जवळ चालले मारेकरी त्या वेळेला । तुटून पडले दोघे अचानक वार खंजिराचा केला ॥ जी ॥ शिवाजी राजा सावध होता चटकन सरला माघारा । शिवरायाचे लोक धावले त्यांनीं पकडलं दोघाला ॥ जी ॥ खंजिराचा वार लागला शिवाला रक्त सांडलं भूवरती । शिवरायाला कवच देवाचें, नाहीं कुणाची मग भीती ॥ जी ॥ हरामखोरांना पकडुन त्यांचे तुकडे तुकडे मग केले । शिवरायाचे शूर मावळे कधीं न फिरले माघारे ॥ जी ॥ ॥ चाल ॥ शिवाजीनं सूड घेण्याचा बेत मग केला ॥ ८ जानेवारी १६६४ ला । शिवाजीनं सुरतेवर केला जोराचा हल्ला ॥ जाळपोळ लुटालूट चालली जागोजागेला ॥ जी ॥ ज्यांनीं ज्यांनीं राजाच्याविरुद्ध होता कट केला । त्यांनाच बडवलं त्या वेळा । जे आले झुंजायला । त्यांचाच नायनाट केला । पण गरिबांना–जनतेला धक्का नाहीं लावला । कैक व्यापारी होता कैद केला । राजानं सोडलं सर्वांला । शिवराज फिरले माघारा । असा अजब तडाखा दिला । पांच कोट रुपयांची लूट केली त्या वेळा ॥ गेला पन्नास लाख मागायला । पण पांच कोटी मिळाले त्याला । इनायतखान वाड्यांतच लपून राहिला ।

पुढं होण्याची छाती नाहीं त्याला । असा मोठा विजय मिळविला । असा मोठा दणका दिला शत्रूला अन् राजा मोठ्या झडपेनं फिरला माघारा । यश चढतं शिवरायाला । **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ जी ॥ ३ ॥

रचना–२०–६–६७.